# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

**दिनांक २९.०८.२०२६ शनिवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २८.०८.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये ११ केसेसमध्ये १२ ईसमावर कारवाई करून एकुण १०,६१०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०२ केसेसमध्ये १० इसमांवर कारवाई करून एकुण ११,७१०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,७४५ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,०४,४५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

दिनांक २८.०८.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक २९.०८.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये ०३ ईसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे एमआयडीसी :—शस्त्रासह धुमधाम करणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २८.०८.२०२६ चे २३.४५ वा. चे सुमारास, एमआयडीसी पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, झोन चौक ते अमरनगर रोडवर एक इसम शस्त्र घेवून धुमाकुळ घालत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, एक इसम हातात मोठा चाकु घेऊन लोकांना शिवीगाळ करतांना दिसला. त्यास घेराव टाकला असता, तो पोलीसांना पाहुन पळु लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले व त्यास निशस्त्र केले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव योगेश भाऊराव बसवंत वय २८ वर्षे रा. नरसिंगपुर, ता. कारंजा घाडगे, जि. वर्धा ह.मु. पंचशीलनगर, हिंगणा रोड येथे किरायाने, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन एक लोखंडी मोठा चाकु किंमती ३००/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु घेवुन धुमाकुळ घालतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे एमआयडीसी येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे नंदनवन :— चोरी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी शुभम हेमराज पवनीकर वय २८ वर्षे रा. तांडापेठ, जुनी वस्ती, गोळीबार चौक, पाचपावली, नागपूर हे पुनम एंटरप्रायझेस, नंदनवन येथे सेल्समनचे काम करतात. दिनांक २८.०४.२०२६ रोजी ते एंटरप्रायझेस

मधुन सेल करण्याकरीता एका हिरव्या रंगाचे व एका पांढरे रंगाचे कापडी पिशवीमध्ये वेगवेगळया कंपनीचे सिगारेटचे पाकिटे एकूण कि. १,१४,३४२/– रु. चा माल आपले ॲक्टिवा गाडी क्र. एमएच ४९ सीए ५१३९ वर घेऊन निघाले अंदाजे १२.१० वा. चे सुमारास, ते पोलीस ठाणे नंदनवन हद्दीत, ईश्वर नगर चौक येथील जट्टेवार सभागृहाचे विरुध्द बाजुस असलेल्या अव्वल टि शॉपसमोरील रोडचे कडेला आपली गाडी लाऊन, टी–शॉप येथे मालाची ऑर्डर विचारण्यास गेले व टिशॉप येथे लागणाऱ्या मालाचे ऑनलाईन पेमेंट घेऊन मागितलेल्या सिगारेटचा माल आणण्याकरीता गाडीजवळ आले असता, गाडीवरील सिगारेट असलेल्या दोन्ही पिशव्या दिसुन आल्या नाहीत. कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे गाडीवरील किंमती १,१४,३४२/–रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

यािप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नंदनवन येथे पोउपनि. निलेश दळवी ७०२०३६१३९६ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

## (अकस्मात मृत्यु)

**१) पोलीस ठाणे तहसील :–** दिनांक २८.०८.२०२६ चे १४.४५ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे तहसील हद्दीत, पाचपावली पहिले रेल्वे फाटक जवळील फुटपाथवर एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ४० वर्षे वयाचे, बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. मृतकाचे वर्णन–अंगात मळकट पांढरे रंगाचा शर्ट व काळ्या रंगाचा फुलपॅन्ट घातलेला आहे. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे तहसील येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे तहसील येथे सपोनि सुशांत भगत यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे सिताबर्डी :–** दिनांक २८.०८.२०२६ चे १६.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीत, एमपी बसस्टॅन्ड जवळील पुजा जनरल स्टोअर्स समोर एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ३२ ते ३५ वर्षे वयाचे, अंगात निळया पांढरे रंगाचे हॉफबाहीचे शर्ट व डार्क निळया रंगाचा जिन्सपॅन्ट घातलेले, उजवे हातात लोखंडी कडे घातलेले, डोक्याचे केस–काळे व कुरळे, दाढी मिशी असलेले, पायात लाल रंगाची स्लिपर घातलेल्या वर्णनाचे, बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. वर्णनावरुन मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे सिताबर्डी येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे सिताबर्डी येथे सपोनि पंकज सयाम यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

## (मिसिंग)

**पोलीस ठाणे तहसील :–** कु. शिवानी मनिष गोखले वय २७ वर्षे, रा. महालक्ष्मी किराणाजवळ, गोळीबार चौक, तहसील, नागपूर ही दिनांक २५.०८.२०२६ चे १३.०० वा. पोलीस ठाणे तहसील हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग–गोरा, चेहरा–गोल, बांधा–मध्यम, उंची–५ फुट ३ इंच, डोळे–काळे, केस–काळे, अंगात– काळे आकाशी रंगाचा कुर्ता पायजामा घातलेला आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलते.



कु. शिवानी

**(ईतर)**

**<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—</u>**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. तदर्थ जिल्हा न्यायाधिश—२ तथा अति. सत्र न्यायाधीश, नागपुर. | १७७/ २०२६ | कलम ३५३, १४३,१४९, ३४१,३३६, ३३७, ३३२, ४२७ भा.दं.वि. | १) राजेश उके वय २४ वर्ष<br>२) शांतिलाल भोयर वय २२<br>३) सतिश सोनवणे वय २२<br>४) मनोहर हिंगे वय २५ वर्ष<br>५) मनोज दहीकर वय २५ वर्ष<br>वर्ष रा. गोपालनगर, नागपूर | ०२.०९.२०२६ |

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**